ePaper

कुर्ला स्थानकात उभ्या असलेल्या लोकलला आग, धुराचे लोळ उठल्याने घबराट

| वर्ष - 9 । अंक -136 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

## आतील पानांत

- सरफराज खानने घडवला इतिहास!
- भारत-न्यूझीलंड सामन्यांची वेळ बदलली?
- 'सर्व पुरूषांना तुरूंगात टाकणार का?
- भारतावर लादणार ५०० टक्के टॅरिफ?

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 9 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक: अडीच वर्षांनंतर काका–पुतण्या एकाच मंचावर

# रोहित पवार घड्याळाच्या प्रचारात!

## अजित पवारांसोबत पुण्यातून भाजपवर हल्लाबोल करणार?



। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी जोरात सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी आणि निर्णायक घडामोड घडताना दिसत आहे. पिंपरी-चिंचवड आणि पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट प्रत्यक्ष मैदानात एकत्र आले असून, आजपासून आमदार रोहित पवार हे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे प्रमुख अजित पवार यांच्यासमवेत प्रचारात सक्रिय होत आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, भाजपविरोधात राष्ट्रवादीचा हल्लाबोल आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.**

राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू किंवा कायमचा मित्र नसतो, असे सूचक विधान अजित पवार यांनी 'एबीपी माझा'च्या 'कॉफी विथ कौशिक' या पॉडकास्टमध्ये केले होते. दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आल्याच्या चर्चांवर बोलताना त्यांनी ही भूमिका मांडली होती. त्याच पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी प्रत्यक्ष प्रचारात एकत्र येताना दिसत आहेत. मात्र, आतापर्यंत सुप्रिया सुळे आणि रोहित पवार हे प्रचारात दिसले नव्हते. त्यामुळे हे नेते कधी मैदानात उतरतील, असा प्रश्न कार्यकर्त्यांसह राजकीय निरीक्षकांना पडला होता. अखेर, आजपासून रोहित पवार अजित पवारांसोबत प्रचारात सहभागी होत असल्याने हा संभ्रम दूर झाला आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा थेट सामना रंगताना दिसत आहे. शहरातील विकासकामे, भ्रष्टाचाराचे आरोप, स्थानिक सत्ताधाऱ्यांवरील नाराजी अशा मुद्द्यांवर राष्ट्रवादी आक्रमक झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील भाजप नेतृत्वावर सातत्याने टीका करत आहेत. अशा स्थितीत रोहित पवार यांच्या प्रचारातील प्रवेशामुळे भाजपविरोधी रणनीतीला अधिक धार मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

- राष्ट्रवादीची संयुक्त ताकद; राजकीय चर्चांना उधाण
- रोहित पवार आजपासून अजित पवारांसोबत प्रचारात सक्रिय
- घड्याळ आणि तुतारीचा संयुक्त प्रचार, भाजपविरोधात आक्रमक भूमिका
- "राजकारणात कोणी कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो" – अजित पवारांचे सूचक विधान

आज सकाळीच एबीपी माझाशी संवाद साधताना अजित पवार यांनी लवकरच सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि निलेश लंके हे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रचारात दिसतील, असे सुतोवाच केले होते. त्यानुसार आजपासून रोहित पवार प्रचारात उतरले असून, ते 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हासोबतच 'घड्याळ' या चिन्हाचा देखील प्रचार करताना दिसणार आहेत. हा संयुक्त प्रचार राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणारा ठरत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर तब्बल अडीच वर्षांनी अजित पवार आणि रोहित पवार हे पहिल्यांदाच एका राजकीय मंचावर एकत्र आले. पिंपरी-चिंचवडमधील सांगवी येथे झालेली प्रचार सभा यासाठी निमित्त ठरली. या सभेत दोन्ही नेत्यांची उपस्थिती ही केवळ प्रचारापुरती मर्यादित न राहता, भविष्यातील राजकीय समीकरणांची नांदी मानली जात आहे. "दादा हे रॉकी भाई आहेत," असे विधान रोहित पवार यांनी करताच सभेत एकच हशा पिकला आणि राजकीय वातावरणात एक वेगळीच रंगत आली. या सभेत अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कथित भ्रष्टाचारावर थेट बोट ठेवले. स्थानिक सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करत त्यांनी गुंडगिरी आणि दादागिरी करणाऱ्यांना धडा शिकवण्याचा इशारा दिला. "प्रेमात आणि युद्धात सर्व काही माफ असत, पण जनतेच्या पैशाशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही," अशा शब्दांत अजित पवारांनी भाजपवर निशाणा साधला. त्यांच्या या आक्रमक भूमिकेला रोहित पवार यांचा पाठिंबा मिळाल्यास राष्ट्रवादीचा प्रचार अधिक धारदार होणार असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवत असून, दोन्ही गटांचे नेते आणि कार्यकर्ते एकमेकांच्या उमेदवारांचा प्रचार करताना दिसत आहेत. ही एकजूट तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये समाधान निर्माण करणारी असल्याचे अजित पवार यांनीही मान्य केले आहे. दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्णपणे एकत्र येतील का, या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, "सध्या निवडणुकांची धामधूम सुरू आहे. उमेदवार निवड, प्रचार आणि संघटन यामध्येच वेळ जातोय. त्यामुळे याबाबत सध्या विचार केलेला नाही. पण कार्यकर्ते समाधानी आहेत, हे महत्त्वाचे आहे."

## खासदार सुप्रिया सुळे या देखील रस्त्यावर उतरून घड्याळाचा प्रचार करणाार

येत्या काही दिवसांत खासदार सुप्रिया सुळे या देखील रस्त्यावर उतरून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ चिन्ह) उमेदवारांच्या प्रचारात सहभागी होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची संयुक्त ताकद पूर्णपणे मैदानात उतरलेली पाहायला मिळणार आहे. एकूणच, रोहित पवार यांचा घड्याळाच्या प्रचारातील प्रवेश आणि अजित पवारांसोबत एकाच मंचावर दिसणे ही राष्ट्रवादी काँग्रेससाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वाची घडामोड ठरत आहे. भाजपविरोधात राष्ट्रवादी किती आक्रमक भूमिका घेते, काका–पुतण्या जोडीचा मतदारांवर नेमका काय परिणाम होतो आणि या एकजुटीचा निवडणूक निकालांवर कितपत प्रभाव पडतो, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

**राष्ट्रवादी कॉंग्रेसला मोठा धक्का**

## Ajit Pawar यांच्या हातून महापालिका निसटणार?

# पुण्याच्या राजकारणात भूकंप!

## खरात यांनी सोडली पवारांची साथ

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार सुरू आहे. सर्वत्र निवडणुकीचा रणसंग्राम सुरू आहे. 15 तारखेला मतदान आणि 16 तारखेला निकाल जाहीर होणार आहे. राज्यात सर्व पक्ष आपल्या विजयासाठी प्रचार करत आहेत. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. दरम्यान पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका जिंकण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे मोठा जोर लावताना दिसून येत आहेत. दरम्यान निवडणुकीआधी अजित पवारांना मोठा धक्का बसला आहे. बड्या नेत्याने त्यांची साथ सोडल्याचे समोर येत आहे.**



पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका जिंकण्यासाठी अजित पवारांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. अजित पवार पुण्यात ठाण मांडून बसल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान अजित पवारांची साथ एका बड्या नेत्याने साथ सोडली आहे. अजित पवारांनी आरपीआय (खरात गट) शी युती केली होती.आरपीआय (खरात) गटाचे प्रमुख सचिन खरात यांनी अजित पवारांना मोठा धक्का दिला आहे. त्यांची अचानक निवडणुकीतून माघार घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांनी कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा नसेल असे जाहीर केल्याचे म्हटले जात आहे. सचिन खरात यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने अजित पवारांसामोर प्रश्न उभा राहिला आहे.

राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरु आहे. मुंबईसह 29 पालिकांच्या निवडणूका जाहीर झाल्या असून येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होणार आहे. तर 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल हाती येणार आहे. मात्र त्यापूर्वी मागील हेवेदावे विसरुन युती होत असल्यामुळे पुढील काळामध्ये नवीन समीकरणे दिसून येण्याची शक्यता आहे. पालिका निवडणुकांमध्ये अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची युती झाली आहे. मात्र ही युती पुढे कायम राहणार का याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूचक प्रतिक्रिया दिली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यामध्ये त्यांनी विविध राजकीय विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी शरद पवारांसोबत केलेल्या युतीबाबत त्यांना प्रश्न विचारण्यात आला. तसेच अजित पवार हे पुन्हा एकदा पूर्ण राष्ट्रवादीमध्ये दिसणार का असा प्रश्न विचारण्यात आला. यावर अजित पवारांनी दिलेले उत्तर हे चर्चेचा विषय ठरला आहे. अजित पवार म्हणाले की, . मी या विषयावर आताच भाष्य करणार नाही. राज्याचे बजेट आणि त्यानंतर होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुका पार पडू द्या, मगच मी यावर सविस्तर बोलेन, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली आहे.राज्यात महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार सुरू आहे. सर्वत्र निवडणुकीचा रणसंग्राम सुरू आहे. 15 तारखेला मतदान आणि 16 तारखेला निकाल जाहीर होणार आहे. राज्यात सर्व पक्ष आपल्या विजयासाठी प्रचार करत आहेत. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. दरम्यान पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका जिंकण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे मोठा जोर लावताना दिसून येत आहेत. दरम्यान निवडणुकीआधी अजित पवारांना मोठा धक्का बसला आहे. बड्या नेत्याने त्यांची साथ सोडल्याचे समोर येत आहे.

### सचिन खरात यांनी सोडली साथ

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका जिंकण्यासाठी अजित पवारांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. अजित पवार पुण्यात ठाण मांडून बसल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान अजित पवारांची साथ एका बड्या नेत्याने साथ सोडली आहे. अजित पवारांनी आरपीआय (खरात गट)शी युती केली होती.आरपीआय (खरात) गटाचे प्रमुख सचिन खरात यांनी अजित पवारांना मोठा धक्का दिला आहे.

# सूस गावात भाजपची विजय पदयात्रा!

## प्रभाग क्रमांक 09 मध्ये भाजपचे उमेदवार विजयी होणार?

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील सूस गावात भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराने निर्णायक वळण घेतले असून, प्रभाग क्रमांक ०९ मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार रोहिणी चिमटे, गणेश कळमकर, मयुरी कोकाटे आणि लहू बालवडकर विजयाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. आज भाजपाच्या प्रचारार्थ काढण्यात आलेली भव्य पदयात्रा म्हणजेच सूस गावातील नागरिकांनी दिलेला विजयाचा कौल ठरला आहे.**





भगवती नगर येथून सुरू झालेली ही पदयात्रा भैरवनाथ मंदिर येथे समाप्त झाली. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी फुलांची उधळण, औक्षण आणि घोषणाबाजी करत भाजपचे जोरदार स्वागत केले. हा उत्स्फूर्त प्रतिसाद केवळ औपचारिक नव्हता, तर सूस गावाच्या विकासासाठी भाजपच योग्य पर्याय असल्याचा ठाम राजकीय संदेश देणारा होता.सूस गावातील प्रत्येक घरातून मिळालेला पाठिंबा, ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि तरुणांचा विश्वास यामुळे भाजपचा प्रचार अधिक बळकट झाला आहे. जनतेने दाखवलेला हा विश्वास सूस गावाच्या उज्वल भविष्यासाठीचा मजबूत आधार ठरत असून, प्रभाग क्रमांक ०९ मध्ये भाजप आघाडीवर असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

ही निवडणूक सत्तेसाठी नसून जनतेच्या सेवेसाठी असल्याची भूमिका भाजपने पुन्हा एकदा अधोरेखित केली. मतदारांनी दिलेले प्रत्येक मत हे सूस गाव आणि संपूर्ण प्रभाग क्रमांक ०९ च्या प्रगतीचा पाया ठरणार असून, विकासालाच प्राधान्य दिले जाईल, आराखडा जनतेसमोर मांडला असून, रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता, आरोग्य सुविधा, उद्याने, स्ट्रीटलाइट्स आणि वाहतूक व्यवस्थेचा सर्वांगीण विकास केला जाईल.

### ०९ मध्ये विजयाचा कल स्पष्ट

यावेळी भाजप नेते लहू बालवाडकर यांनी नागरिकांना संबोधित करत सांगितले की, मला तुम्ही मत देऊन सेवा करण्याची एक संधी द्या; पुढील ५ वर्ष ही तुमच्या आमच्या प्रभागाच्या विकासाची असतील. शब्दांपेक्षा कामातूनच भाजप आपली विश्वासार्हता सिद्ध करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आजच्या या भव्य पदयात्रेनंतर एक गोष्ट स्पष्ट झाली, प्रभागात भाजपला जनतेचा ठाम पाठिंबा मिळत असून, प्रभाग क्रमांक ०९ मध्ये विजयाचा कल स्पष्टपणे भाजपच्या बाजूने झुकलेला दिसत आहे.भगवती नगर येथून सुरू झालेली ही पदयात्रा भैरवनाथ मंदिर येथे समाप्त झाली.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक : प्रतिष्ठेच्या जागांवर निकालाकडे साऱ्यांचे लक्ष

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'होमपिच'वरच दिग्गजांची अग्निपरीक्षा!

## खासदार–आमदारांच्या प्रभागांत थेट लढती, तिरंगी सामना आणि अपक्षांची ताकद

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीची रणधुमाळी आता शिगेला पोहोचली असून, शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. विशेष म्हणजे, खासदार आणि आमदार ज्या प्रभागांत वास्तव्यास आहेत, त्या 'होमपिच'वरच यंदा त्यांची खरी अग्निपरीक्षा होताना दिसत आहे.**



परंपरेने या प्रभागांत स्थानिक नेत्यांचा प्रभाव अधिक असतो. मात्र, यंदाच्या निवडणुकीत विरोधकांनी थेट आव्हान उभे केल्याने अनेक ठिकाणी दुरंगी, तर काही प्रभागांत तिरंगी लढती रंगल्या आहेत. अपक्ष उमेदवारांची वाढती ताकदही या निवडणुकीला वेगळे वळण देणारी ठरत आहे. त्यामुळे कोणाच्या गळ्यात विजयाचा हार पडणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

शिंदेसेना–राष्ट्रवादी (अजित पवार) युती आणि भाजप यांच्यातील संघर्ष अनेक प्रभागांत निर्णायक ठरत आहे. खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे आणि चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या प्रभावक्षेत्रात असलेल्या प्रभाग क्रमांक २४ (थेरगाव, डांगे चौक, गणेशनगर) मध्ये राजकीय लढत अधिकच रंगली आहे. येथे शिंदेसेना–राष्ट्रवादी (अजित पवार) यांची युती असली, तरी भाजपने कमळ चिन्हावर एकच अधिकृत उमेदवार दिला आहे. उर्वरित तीन उमेदवारांचे एबी फॉर्म बाद झाल्याने ते अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता असून, ही लढत अत्यंत चुरशीची बनली आहे.

माजी आमदार आणि खासदारांच्याही प्रभागांत प्रतिष्ठेची लढाई सुरू आहे. माजी खासदार अमर साबळे यांच्या प्रभाग क्रमांक १५ मध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (अजित पवार) अशी थेट टक्कर होत आहे. दोन्ही पक्षांनी येथे ताकद लावली असून, स्थानिक समीकरणांमुळे निकाल अनिश्चित मानला जात आहे. त्याचप्रमाणे, माजी आमदार विलास लांडे यांच्या प्रभाग क्रमांक ८ मध्येही राष्ट्रवादी (अजित पवार) विरुद्ध भाजप असा थेट सामना होत आहे. या प्रभागात संघटनात्मक ताकद आणि स्थानिक प्रश्न निकाल ठरवतील, अशी चर्चा आहे.

विधानपरिषदेतील भाजपच्या आमदार उमा खापरे यांच्या घरच्या प्रभाग क्रमांक १९ (भोईर कॉलनी, पिंपरी कॅम्प, भाटनगर) मध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (अजित पवार) असा सामना रंगला आहे. मिश्र लोकसंख्या, स्थानिक विकासकामे आणि प्रलंबित प्रश्नांमुळे येथील राजकीय वातावरण सतत बदलत आहे. त्यामुळे मतविभाजनाची शक्यता नाकारता येत नाही.

त्याचवेळी, विधानपरिषदेतील भाजपचेच आमदार अमित गोरखे यांच्या घरच्या प्रभाग क्रमांक १३ (यमुनानगर, ओटास्कीम, निगडी) मध्ये मात्र चित्र अधिक गुंतागुंतीचे आहे. येथे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) अशी तिरंगी लढत होत आहे. तिन्ही पक्षांनी स्वतंत्र ताकद उभी केल्याने मतांचे विभाजन निर्णायक ठरणार आहे. या प्रभागाचा निकाल शहरातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकणारा ठरू शकतो.

### दिग्गज नेत्यांच्या 'होमपिच'वरच खरी कसोटी

एकूणच, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत दिग्गज नेत्यांच्या 'होमपिच'वरच खरी कसोटी लागत आहे. युती, विरोधक आणि अपक्ष उमेदवारांमुळे राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची झाली असून, प्रत्येक प्रभागाचा निकाल शहराच्या राजकारणाची दिशा ठरवणारा ठरणार आहे. त्यामुळे या प्रतिष्ठेच्या लढतींकडे आता संपूर्ण पिंपरी-चिंचवडचे लक्ष लागले आहे.

भाजपचे चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या घरच्या प्रभाग क्रमांक ३१ (नवी सांगवी, पिंपळे गुरव, साई चौक) मध्येही भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (अजित पवार) अशी थेट लढत आहे. विकासकामे, स्थानिक नेतृत्व आणि संघटनात्मक ताकद या मुद्द्यांवर निकाल ठरणार आहे. विशेष म्हणजे, भाजपने पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीची संपूर्ण धुरा निवडणूक प्रमुख म्हणून आमदार शंकर जगताप यांच्यावरच सोपवली आहे. त्यामुळे त्यांच्या 'होमपिच'वरील निकाल प्रतिष्ठेचा विषय ठरला आहे.

भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या घरच्या प्रभाग क्रमांक ७ (भोसरी गावठाण, शीतलबाग) मध्येही भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (अजित पवार) अशीच थेट झुंज पाहायला मिळत आहे. या प्रभागात दोन्ही पक्षांनी जोरदार प्रचार सुरू केला असून, पारंपरिक मतदारांसोबत नवमतदारांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या घरच्या प्रभाग क्रमांक १४ (आकुर्डी गावठाण, काळभोरनगर) मध्येही राष्ट्रवादी (अजित पवार) विरुद्ध भाजप अशी थेट लढत आहे. मागील निवडणुकीत हा प्रभाग शिवसेनेने काबीज केला होता. त्यानंतर काही स्थानिक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने समीकरणे बदलली आहेत. भाजपच्या आक्रमक हालचालींमुळे हा सामना अधिकच चुरशीचा बनला आहे.

# उद्योगनगरीत लोकशाहीचा उत्सव!

## टाटा मोटर्समध्ये मतदानाची शपथ; फ्लॅश मॉब व पथनाट्यातून मतदानाचा जागर

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत आहे. राज्य सरकारच्या औद्योगिक विभागाने त्या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे. या सुट्टीचा उपयोग सर्वप्रथम मतदानासाठी करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी व्यक्त केले.**



लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्वीप अंतर्गत राबवण्यात येत असलेल्या मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत आज पिंपरी येथील टाटा मोटर्स कंपनीमध्ये भव्य मतदान शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी त्या बोलत होत्या.

भारतरत्न जे. आर. डी. टाटा व रतन टाटा यांना अभिवादन करून सुरू करण्यात आलेल्या या मतदान शपथ कार्यक्रमात टाटा मोटर्स कंपनीतील अधिकाऱ्यांसह सुमारे ३ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी मतदानाची शपथ घेत उत्स्फूर्तपणे लोकशाही उत्सवात सक्रिय सहभाग घेण्याचा व १००% मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह टाटा मोटर्सचे व्यवस्थापन अधिकारी आनंद लपारकर, आनंद आगाशे, डॉ. संतोष जाधव, अतुल आहिर, नितीन कदम तसेच कंपनीतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन अण्णा बोदडे यांनी मानले.

### फ्लॅश मॉब व पथनाट्याने जिंकली मने

मतदान जनजागृतीसाठी यावेळी लहान मुलांकडून सादर करण्यात आलेल्या फ्लॅश मॉबने उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणाचे कंपनीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मनापासून कौतुक करत मुलांना छोटी भेटवस्तू देऊन प्रोत्साहन दिले. याचबरोबर मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे पथनाट्य सादर करण्यात आले, ज्यातून नागरिकांनी मतदान का करावे, याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

> टाटा मोटर्ससारख्या मोठ्या औद्योगिक संस्थेत घेतलेला मतदान शपथ कार्यक्रम हा संपूर्ण शहराला लोकशाही सहभागाचा संदेश देणारा ठरला आहे. सुदृढ, सक्षम आणि उत्तरदायी लोकशाहीसाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे ही केवळ जबाबदारी नसून ती लोकशाहीप्रतीची कर्तव्यभावना आहे.
>
> —**अण्णा बोदडे,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका



## भूमिका

# देव आपल्यापुरता मर्यादित ठेवावा

**देव रोकडा सज्जनी!' हा डॉ. हमीद दाभोलकर यांचा लेख (७ जानेवारी) वाचला. आज सर्वत्र धर्माच्या नावाखाली रक्त सांडताना दिसते आहे, तर काही ठिकाणी उघडपणे रक्तपाताच्या धमक्या दिल्या जात आहेत. एकूणच असे चित्र उभे राहते की धर्म जणू पूर्णपणे असहिष्णु आणि हिंसक झाला आहे, आणि तरीही तोच देवापर्यंत पोहोचण्याचा मार्ग असल्याचा आग्रह धरला जातो.**

धर्माच्या नावावर हिंसा करणारे किंवा तिचे समर्थन करणारे लोक आपापल्या धर्मात गुरु, संत, धर्मगुरू, मौलवी, पादरी किंवा पुजारी म्हणून ओळखले जातात; मात्र त्यांच्या हिंसाचारावर ना देवाचे नियंत्रण दिसते, ना कोणतीही धार्मिक व्यवस्था त्यांना रोखताना आढळते. अशा परिस्थितीत धर्म, धर्माचे ठेकेदार आणि देव—या तिन्हींतला फरक स्पष्टपणे समजून घेणे आणि तो अधोरेखित करणे अत्यंत गरजेचे ठरते.धार्मिक हिंसाचार भारतासाठी नवा नाही. शतकानुशतके या देशाने असे अनेक प्रसंग पाहिले आहेत की एका धर्माच्या शासकांसाठी दुसऱ्या धर्माच्या लोकांची छाटलेली शिरे आणली जात आणि त्याबदल्यात सुवर्णमुद्रांचे बक्षीस दिले जात असे. अनेक आक्रमक धर्म घेऊन येथे आले आणि तो पसरवण्यासाठी तलवारीच्या लष्करी हिंसाचारापासून ते ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारी हिंसाचारापर्यंत



सर्व मार्ग वापरले गेले. धर्माने कधीही अशा हिंसेला थांबवण्याचा ठोस प्रयत्न केला नाही. हिटलरने लाखो निष्पाप ज्यूंची कत्तल केली तेव्हा चर्चही ती थांबवण्यासाठी पुढे आले नाही. भारतात भिंद्रनवालेचे समर्थक सुवर्ण मंदिर परिसरातून दहशत माजवत, ओळख विचारून हिंदूंना ठार मारत असताना शीख पंथाच्या सर्वोच्च नेतृत्वाचे मौनही इतिहासात नोंदले गेले आहे. आज देशात मुस्लिम दहशतवाद किंवा हिंदू दहशतवादी हिंसाचारात जीव जात असताना दोन्ही धर्मांचे धार्मिक नेते त्याविरुद्ध उघडपणे बोलताना दिसत नाहीत. ख्रिश्चन-बहुसंख्य पाश्चात्य देश येशूच्या नावाने शपथ घेतलेल्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या नेतृत्वाखाली अफगाणिस्तान, इराक किंवा पॅलेस्टाईन वर हल्ले करतात, तेव्हाही चर्चची भूमिका असुविधाजनक सत्याकडे डोळेझाक करण्याचीच असते.ही चर्चा आज महत्त्वाची ठरते कारण अनेक लोक धर्माच्या प्रवक्त्यांनाच त्या धर्माचे खरे रूप मानतात आणि पुढे जाऊन धर्मालाच देवाचा समानार्थी समजतात. प्रत्यक्षात या तिन्ही गोष्टींमध्ये स्पष्ट भेद आहे. बहुतांश धार्मिक नेते हे आपल्या धर्माचे प्रतिनिधी कमी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडणारे अधिक असतात. त्यांच्या प्राधान्यक्रमात देवाची संकल्पना बहुतेक वेळा शेवटी येते. धर्माची शिकवण चांगली आहे, चुका त्या पाळणाऱ्यांच्या आहेत, असे म्हणणारेच लोक अनेकदा त्याच चुका करणाऱ्यांना धर्माचे रक्षक मानून मेंढरांसारखे त्यांच्या मागे चालताना दिसतात.

धर्माच्या रचनेची मांडणी काळानुसार राजे, सत्ताधीश ते दहशतवादी सर्वांनी आपल्या सोयीने केली आहे. इस्लामची एक व्याख्या सूफी संतांकडे आहे, जिथे प्रेमाव्यतिरिक्त काही नाही; आणि त्याच इस्लामची दुसरी व्याख्या दहशतवाद्यांकडे आहे, जिथे रक्तपाताशिवाय काही नाही. भारताच्या संतपरंपरेत हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्मांतील अनेक संतांनी दोन्ही ईश्वरी संकल्पना एकत्र गुंफत विपुल लेखन केले आहे. मूर्तिपूजाविरोधी मानल्या जाणाऱ्या इस्लामचे पालन करणाऱ्या संतांनीही राम आणि कृष्णाच्या गुणगानात कधीही संकोच केला नाही. दोन्ही धर्मांत असे असंख्य संत झाले, ज्यांनी परस्पर प्रेम आणि सौहार्द यांचेच संदेश दिले.मात्र आजचे वास्तव असे आहे की धर्माचे सध्याचे कंत्राटदार आणि धर्माची दुकाने यांना धर्मापासून वेगळे करून पाहण्याची वेळ आली आहे. जसा कोणत्याही व्यवसायाचा पहिला आणि शेवटचा हेतू नफा असतो, तसाच धर्माच्या कंत्राटदारांचा उद्देश आपले दुकान अखंड सुरू ठेवणे हा असतो. त्यामुळे धार्मिक स्थळांना धर्माचे प्रतीक मानणे आता गैरलागू ठरते. अनेकदा धार्मिक स्थळांचा व्यवहार धर्माच्या मूळ तत्त्वज्ञानाच्या अगदी विरोधात जाताना दिसतो. किंवा जहन्नम पर्यंत पोहोचतील कदाचित, पण धर्माने वचन दिलेल्या स्वर्गाची किंवा जन्नतची वाट अधिकच धूसर होताना दिसते. आज देवाला ढोंग आणि दिखाव्याने भरलेल्या विधींनी संतुष्ट होणारा समजले जाते.

## प्रासंगिक »

### एक 'पाकिस्तान'?

***स्थितप्रज्ञ आणि व्यावहारिक अलिप्त धोरण राबवण्याची सवय आपल्यालाही आतापासूनच करून घ्यावी लागेल...***

बांगलादेशमध्ये माजी पंतप्रधान बेगम खालेदा झिया यांचा मृत्यू ही त्या देशाच्याच नव्हे, तर भारत-बांगलादेश संबंधांच्या इतिहासातही महत्त्वाची घटना ठरते. बेगम खालेदा या बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी हा त्यांचा पक्ष तब्बल दीड दशकानंतर पुन्हा एकदा सत्तासमीप आला ही काही प्रमाणात त्यांच्याच कर्तृत्वाची पुण्याई. या दीड दशकात त्यांच्या प्रमुख राजकीय प्रतिस्पर्धी राहिलेल्या शेख हसीना सध्या भारतात दडून बसल्या आहेत. त्यांचा पक्ष अवामी लीग, ज्यास फेब्रुवारीत होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सहभागाची परवानगी तेथील हंगामी सरकारने नाकारलेली. त्यामुळे जवळपास निर्नायकी अशा या पक्षाला तसेही फारसे भविष्य नाही. बांगलादेशवासीयांना जवळपास दोन दशकांहून अधिक काळ याच दोघींच्या 'बॅटल ऑफ बेगम्स'ची सवय अंगवळणी पडली होती.

जागतिक राजकारण हे नेहमीच अनिश्चित राहिले आहे. इथे कधी, कुठे, कोणाकडून काय घडेल याचा काही नेम नाही. त्यामुळे एखादी मोठी घटना घडली की तिचे आश्चर्य वाटून घेणे हे नुसता आव आणण्यासारखे आहे. त्यातल्या त्यात अमेरिकेने काही अनाकलनीय केले.

# जग सुधारायला निघालेल्या गावगुंडासारखे...

असे ऐकण्यात आले तरी त्याचे आंतरराष्ट्रीय संबधाच्या अभ्यासकाला, जाणकाराला नवल वाटणेच नवलाचे ठरेल. कारण जेव्हापासून अमेरिकेने आंतराष्ट्रीय राजकारणात उडी घेतली आहे, तेव्हापासून एखाद्या जग सुधारायला निघालेल्या गावगुंडाप्रमाणे अमेरिकेचे वर्तन राहिले आहे. व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना आणि त्यांच्या पत्नीला अमेरिकेने अटक करणे हेही एक प्रकारचे सुधारणावादी पाऊल आहे, असे डोनाल्ड ट्रम्प यांचे मत आहे. शीतयुद्धानंतर अमेरिकेने केलेल्या मोठ्या कारवाईपैकी ही एक कारवाई आहे.एका सार्वभौम राष्ट्राच्या राष्ट्रप्रमुखाला असे त्याच्याच जाऊन देशात अटक करून घेऊन जाणे म्हणजे आंतराष्ट्रीय कायदा, आंतराष्ट्रीय नैतिकता आणि युनोच्या सनदेची चेष्टाच. शिवाय यातून युनोचे अपयश, आंतराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन, बहुधृवीकरणाला दिलेली बगल, दक्षिण ध्रुवीय राष्ट्रांनी चीन, रशिया, भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांनी उभ्या केलेल्या नव्या



चळवळीसमोर आव्हान आणि नवीन विश्वरचनेनंतरच्या अमेरिकेच्या भूमिकेची पुनरावृत्ती झालेली दिसून येते. या सर्व परिस्थितीचा विचार करता काही घटकांची चर्चा होणे अगत्याचे वाटते.अमेरिकेने आपले शीतयुध्द आणि शीतयुद्धोत्तर काळातील परराष्ट्र धोरण बदलले नाही, तसेच अमेरिकेने व्हेनेझुएलावर आक्रमण का केले या दोन मुद्द्यांचा मागोवा घेतला तर असे लक्षात येईल की, व्हेनेझुएलाची राजधानी कराकसावर आक्रमण करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला अमेरिकेने केलेली अटक हे काही अमेरिकेकडून केल्या गेलेल्या लष्करी कारवाईचे पहिले उदाहरण नाही. यापूर्वी जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी विध्वंसक शस्त्र निर्मिती, मानवी हक्काचे उल्लंघन, दहशतवादाला पाठिंबा अशा कारणांनी इराकचा हुकुमशहा सद्दाम हुसेन याला २००३ साली अटक (युनोच्या विरोधात जाऊन) आणि २००६ साली त्याच्याच देशात फाशी दिली होती.बराक ओबामा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना लीबियाचा हुकुमशहा गद्दाफीला दहशतवादाला पाठिंबा, LOCKERBIE विमान बॉम्बस्फोट (१९८८), अमेरिका विरोधी संघटनांना मदत ही कारणे पुढे करून २०११ साली नाटोच्या मदतीने अमेरिकेने लष्करी हस्तक्षेप केला होता व यातच आंदोलकाकडून गद्दाफीची हत्या करण्यात आली. याशिवाय जपान (१९४५), कोरिया (१९५०), व्हिएतनाम (१९६४-७३), ग्रेनेडा (१९८३),पनामा (१९८९), अफगाणिस्तान (२००१ आणि २०२१), इराण (१९५३,१९८०), सिरीया (२०१४) या राष्ट्रात प्रत्यक्ष आणि युगोस्लाव्हिया, लिबिया, सिरीया या देशात नाटोसोबत मिळून अमेरिकेने लष्करी कारवाई केली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## उद्धव ठाकरेंचा आरोप — मुंबईत मराठी माणसांवर दादागिरी सुरु झाली आहे

# भाजपा हा हिंदुत्ववादी पक्ष नाहीच!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महापालिकेसह २९ महापालिकांची निवडणूक पुढच्या आठवड्यात १५ जानेवारी रोजी रंगणार आहे. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. तर भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची युती लढते आहे. या निवडणुकांमध्ये नेमकं काय होणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. दरम्यान महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी भाजपावर जोरदार टीका केली आहे. तसंच शिंदे सेनेचा वापर करतील आणि फेकून देतील असंही म्हटलं आहे.**

## घाटकोपरची भाषा गुजराती



निवडणूक योग्य पद्धतीने व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. पूर्वी एक परिस्थिती होती की चोर चोर म्हटलं की तो चोर पळून जायचा. आता चोरच अभिमानाने सांगतो आहे की तो चोर आहे. अशी परिस्थिती महाराष्ट्रात कधीही नव्हती. त्यामुळे एक प्रकारची विचित्र अशी ही निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सुसंस्कृतपणा होता. पण आता राजकारणाचं विद्रुपीकरण करुन ठेवलं आहे." असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. उद्धव ठाकरेंनी झी २४ तास या वाहिनीवरील टू द पॉईंट मुलाखत विशेष कार्यक्रमात उद्धव ठाकरेंनी हे भाष्य केलं आहे.भाजपा हा हिंदुत्ववादी पक्ष नाहीच. भाजपा हा सत्तावादी पक्ष आहे. जनसंघ हा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सर्वात शेवटी सहभागी झाला आणि सर्वात आधी बाहेर पडला. काही ओरपायला मिळालं तर बरं या दृष्टीने जनसंघ चळवळीत आला होता. कारण यांचा (भाजपा) डीएनए हा संधीसाधूपणाचा आहे, वरुन साधू असल्याचा आव फक्त ते आणत आहेत बाकी काही नाही. सत्तेसाठी कुणाशीही युती करायला ते तयार आहेत. गुंड वगैरे कुणाशीही युती करणं सुरु आहे. भाजपा हा एक पेशीय अमिबा सारखा वाढत चालला आहे. त्याला सगळं पाहिजे, हिंदुत्व वगैरे काहीही नाही ते काहीही करत आहेत. एमआयएम बरोबर अकोट मधली युती करणं हा भाजपाचा लव्ह जिहाद आहे. भाजपाचे मंत्री गोमांस खातात आणि ते आम्हाला हिंदुत्व शिकवत आहेत. महापालिकेत हिंदू-मुस्लिम हा मुद्दा नाही. असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.आम्ही सांगतो आहे, आमचा महापौर मराठीच होईल. हिंदू म्हणून आम्ही एकत्र होतो, मुंबईवर आणि आपल्यावर ते हिंदी सक्ती करायला लागले. त्यांचे ते कुणीतरी नेते येऊन काय बोलले? घाटकोपरची भाषा गुजराती आहे हे ठरवणार आणि आपण ऐकून घ्यायचं? असाही प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला आहे. भाजपाने मुंबईला तीन लाख कोटींच्या खड्डयात घातलं आहे, मुंबईला लुबाडण्याचं काम चाललं आहे असाही आरोप उद्धव ठाकरेंनी केला.मुंबईमध्ये गेल्या दोन ते तीन वर्षांत मराठी माणसांवर दादागिरी सुरु झाली. देशातलं एक राज्य दाखवा जिथे मराठी माणूस दादागिरी करतो आहे. घर नाकारलं जातं, आहारावरुन ऐकावं लागतं आहे. जो मराठी माणूस जिथे गेला तिथला बनून राहिला आहे. आमच्याच घरात येऊन आमच्यावर दादागिरी करायला लागले आहेत त्याला आमचा विरोध आहे. यांचे शेठ दिल्लीत बसले आहेत म्हणून यांची मस्ती वाढली आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.मुंबई महापालिकेसह २९ महापालिकांची निवडणूक पुढच्या आठवड्यात १५ जानेवारी रोजी रंगणार आहे. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. तर भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची युती लढते आहे. या निवडणुकांमध्ये नेमकं काय होणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. दरम्यान महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी भाजपावर जोरदार टीका केली.

### भाजपा हा सत्तावादी पक्ष

शिंदे सेनेचा वापर करतील आणि फेकून देतील असंही म्हटलं आहे.निवडणूक योग्य पद्धतीने व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. पूर्वी एक परिस्थिती होती की चोर चोर म्हटलं की तो चोर पळून जायचा. आता चोरच अभिमानाने सांगतो आहे की तो चोर आहे. अशी परिस्थिती महाराष्ट्रात कधीही नव्हती. त्यामुळे एक प्रकारची विचित्र अशी ही निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सुसंस्कृतपणा होता.

# निवडणुकीनंतर शिक्षकांना एक सुट्टी द्या!


## 16 जानेवारी रोजी सुट्टी मंजूर करण्यात यावी शिक्षक संघटनेची मागणी...

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिका निवडणुकीसाठी शहरातील बहुतांश शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टी न देता सलग दीर्घकाळ काम करावे लागणार आहे. त्यामुळे निवडणूक कामानंतर त्यांना विश्रांतीसाठी १६ जानेवारी रोजी सुट्टी मंजूर करण्यात यावी, अशी मागणी शिक्षक संघटनेकडून करण्यात आली आहे.**

निवडणुकीमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १४ व १५ जानेवारी रोजी सुमारे ३० ते ३५ तास सलग काम करावे लागणार आहे. १४ जानेवारी रोजी मकर संक्रांत असून त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असतानाही कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्य बजावावे लागणार आहे. सलग काम आणि सार्वजनिक सुट्टीत सेवा बजावल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर होणारा शारीरिक व मानसिक ताण लक्षात घेऊन त्यांना विश्रांतीसाठी सुटी देणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे निवडणूक कर्तव्यावर असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १६ जानेवारी रोजी सुट्टी देण्यात यावी, अशी



मागणी महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तानाजी कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण विभाग अध्यक्ष अमित कारंडे यांनी ७ जानेवारी रोजी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग तसेच मुख्य निवडणूक आयोग येथील अधिकाऱ्यांची मंत्रालयात भेट घेऊन निवेदन दिले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या या प्रश्नांबाबत निवेदन किंवा केवळ चर्चा न करता त्याचा मंत्रालय स्तरावर नियमित पाठपुरावा करणार असल्याचे महाराष्ट्र पुरोगामी संघटनेकडून सांगण्यात आले. त्यामुळे निवडणूक कामावर नियुक्त असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १६ जानेवारी रोजी सुट देण्याच्या मागणीबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा संघटनेच्यावतीने व्यक्त करण्यात आली.निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीची गरज आहे, मात्र त्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुटीत आणि सलग ३० ते ३५ तास काम करण्यास भाग पाडणे योग्य नाही. मकरसंक्रांतसारख्या सणाच्या दिवशीही कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे काम करावे लागणार आहे.

### कर्मचाऱ्यांना सुट्टी देणे आवश्यक

सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुट्टी देणे आवश्यक आहे, असे मत महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तानाजी कांबळे यांनी व्यक्त केले.महानगरपालिका निवडणुकीसाठी शहरातील बहुतांश शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती करण्यात आली आहे.

## नागरी प्रश्नांवर बेधडक विधाने | कुत्र्यांबाबत न्यायालयाच्या टिप्पणीवर अभिनेत्रीचा संताप

# ‘सर्व पुरुषांना तुरुंगात टाकणार का?

## स्पदंनाने दिली तिखट प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अभिनेत्री आणि राजकारणी असलेल्या दिव्या स्पदंना उर्फ राम्या यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या एका टिप्पणीवर रोष व्यक्त करणारे विधान केले आहे. भटक्या कुत्र्यांच्या विषयावर बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. कुत्रे चावणार आहेत की नाही, ही त्यांची मनस्थिती कशी ओळखणार? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला होता. अभिनेत्री दिव्या स्पदंनाने याची तुलना पुरूषांशी केली आहे.**




रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांच्या धोक्याबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, भटके कुत्र्यांची मनस्थिती कुणाला समजू शकत नाही. तर याचिकाकर्त्यांनी सांगितले की, प्राण्यांशी सहानुभूतीने राहिल्यास संभाव्य हल्ले टाळता येऊ शकतात. याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिब्बल म्हणाले की, भटक्या कुत्र्यांच्या जागेवर अतिक्रमण झाल्यास ते हल्ला करतात. यावर न्यायाधीश विक्रम मनाथ यांनी म्हटले की, हा विषय फक्त कुत्रा चावण्यापुरता मर्यादीत नाही. तर त्यांच्यामुळे अपघातासारख्या घटनांचाही धोका उद्भवू शकतो. कुत्र्याकडून बघून त्याची मनःस्थिती काय आहे, तो चावणार आहे का? हे कसे ओळखणार?सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांवर दिलेल्या टिप्पणीवर अभिनेत्री दिव्या स्पदंनाने तिखट प्रतिक्रिया दिली आहे. “पुरुषाच्या डोक्यात काय सुरू आहे, हेही कुणाला ओळखता येत नाही. तो कधी बलात्कार किंवा खून करणार आहे, हे सांगता येत नाही. त्यामुळे सर्व पुरुषांना तुरुंगात टाकणार का?”, अशी स्टोरी तिने शेअर केली होती. अभिनेत्री दिव्या उर्फ राम्या अशाप्रकारे रोखठोक मत व्यक्त करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने अनेकदा सामाजिक, राजकीय आणि नागरी प्रश्नांवर बेधडक विधाने केलेली आहेत.कर्नाटकमध्ये अभिनेता दर्शनने त्याचा चाहता रेणुकास्वामीचा निर्घृणपणे खून केला होता. यानंतर अभिनेता दर्शनाला अटक झाली. या प्रकरणात मत व्यक्त करताना अभिनेत्री दिव्या स्पदंनाने म्हटले होते की, लोकांना मारझोड करून त्यांची हत्या करणाऱ्या व्यक्तीला समाजात मुक्तपणे फिरू न देता त्याच्यावर कारवाई केली पाहिजे.

### दिव्या स्पदंना काय म्हणाली?

तो कधी बलात्कार किंवा खून करणार आहे, हे सांगता येत नाही. त्यामुळे सर्व पुरूषांना तुरुंगात टाकणार का?”, अशी स्टोरी तिने शेअर केली होती. अभिनेत्री दिव्या उर्फ राम्या अशाप्रकारे रोखठोक मत व्यक्त करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने अनेकदा सामाजिक, राजकीय आणि नागरी प्रश्नांवर बेधडक विधाने केलेली आहेत.

कायद्यापेक्षा कुणीही मोठा नाही. कुणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये. लोकांना मारून तुम्ही मुक्तपणे फिरू शकत नाहीत, अशी पोस्ट त्यांनी इन्स्टाग्राममवर शेअर केली होती.अभिनेत्री आणि राजकारणी असलेल्या दिव्या स्पदंना उर्फ राम्या यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या एका टिप्पणीवर रोष व्यक्त करणारे विधान केले आहे. भटक्या कुत्र्यांच्या विषयावर बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. कुत्रे चावणार आहेत की नाही, ही त्यांची मनस्थिती कशी ओळखणार? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला होता. अभिनेत्री दिव्या स्पदंनाने याची तुलना पुरूषांशी केली आहे. रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांच्या धोक्याबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, भटके कुत्र्यांची मनस्थिती कुणाला समजू शकत नाही. तर याचिकाकर्त्यांनी सांगितले की, प्राण्यांशी सहानुभूतीने राहिल्यास संभाव्य हल्ले टाळता येऊ शकतात. याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिब्बल म्हणाले की, भटक्या कुत्र्यांच्या जागेवर अतिक्रमण झाल्यास ते हल्ला करतात. यावर न्यायाधीश विक्रम मनाथ यांनी म्हटले की, हा विषय फक्त कुत्रा चावण्यापुरता मर्यादीत नाही. तर त्यांच्यामुळे अपघातासारख्या घटनांचाही धोका उद्भवू शकतो. कुत्र्याकडून बघून त्याची मनःस्थिती काय आहे, तो चावणार आहे का? हे कसे ओळखणार?

# ट्रम्प भारतावर लादणार ५०० टक्के टॅरिफ?

## अमेरिकेचा इशारा काय? ‘रशिया निर्बंध कायदा 2025’ आहे तरी काय?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यापासून सातत्याने भारतासह जगाची चिंता वाढवणारे निर्णय घेत आहेत. सध्या अमेरिकेत आयात होणाऱ्या भारतीय मालावर ५० टक्के आयातशुल्क (टॅरिफ) आकारले जात आहे. पण, आता हे शुल्क वाढवून ५०० डॉलर्स केले जाणार असल्याचा इशारा अमेरिकेने दिला आहे.**

डोनाल्ड ट्रम्प यांनी द्विपक्षीय ‘रशिया सँक्शन्स बिल’ला (रशियावरील निर्बंधांचे विधेयक) पाठींबा दिल्यानंतर हे शुल्क आकारले जाण्याची शक्यता आहे.रशियावर ५०० टक्के टॅरिफ लादल्याने अमेरिकेत आयात होणाऱ्या रशियन मालावर ५०० टक्के आयातशुल्क आकारले जाईल, त्यामुळे रशियाला आर्थिक फटका बसून रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यास मदत मिळेल, असे अमेरिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी म्हटले आहे. नुकतंच ‘मारिनेरा’ नावाचे रशियन ध्वज असलेले तेलवाहू जहाज अमेरिकेने जप्त केले आहे. त्याच वेळी, रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणामुळे सुरू झालेले युद्ध संपवण्यासाठी अमेरिकेची वाटाघाटींची प्रक्रियाही सुरू आहे. नक्की काय आहे हे ‘रशिया निर्बंध कायदा २०२५’ विधेयक



(सँक्शनिंग रशिया अ‍ॅक्ट २०२५) म्हणजे? याचा भारतावर परिणाम काय? खरंच ५०० डॉलर्स टॅरिफ लादले जाणार का? सविस्तर जाणून घेऊयात...

‘रशिया निर्बंध कायदा २०२५’ नावाचे हे विधेयक प्रामुख्याने दक्षिण कॅरोलिनाचे रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्राहम आणि कनेक्टिकटचे डेमोक्रॅटिक सिनेटर रिचर्ड ब्लुमेंथल यांनी तयार केले आहे. हा कायदा डोनाल्ड ट्रम्प यांना रशियाकडून तेल, वायू, युरेनियम आणि इतर वस्तूंची निर्यात करणाऱ्या देशांवर शुल्क आणि दुय्यम निर्बंध लादण्याचे अधिकार देतो.

### ट्रम्प शांतता करार मोडत आहे

सेवांवरील शुल्काचा दर राष्ट्राध्यक्षांनी त्या वस्तूंच्या मूल्याच्या तुलनेत किमान ५०० टक्क्यांपर्यंत वाढवला पाहिजे. तसेच, जे देश रशियन बनावटीचे युरेनियम आणि पेट्रोलियम उत्पादनांची जाणीवपूर्वक देवाणघेवाण करतात, त्या देशांतून अमेरिकेत आयात होणाऱ्या सर्व वस्तू आणि सेवांवरील शुल्काचा दर राष्ट्राध्यक्षांनी किमान ५०० टक्क्यांपर्यंत वाढवला पाहिजे.

या विधेयकानुसार, जर अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना असे वाटले की रशिया किंवा रशियाच्या वतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती युक्रेनबरोबर शांततेसाठी वाटाघाटी करण्यास नकार देत आहे, शांतता करार मोडत आहे, युक्रेनवर पुन्हा आक्रमण करत आहे किंवा युक्रेनचे सरकार उलथवून टाकण्याचा प्रयत्न करत आहे, तर कडक दंड आकारला जाऊ शकतो. याशिवाय, रशियन राष्ट्राध्यक्षांसह महत्त्वाच्या रशियन व्यक्तींच्या व्हिसावर बंदी घालणे आणि त्यांची अमेरिकेतील मालमत्ता गोठवण्याचे अधिकारही हे विधेयक राष्ट्राध्यक्षांना देते.

## राजामौलींनी केलं कौतुक

जिनिलीया देशमुख बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. नुकतीच ती आमिर खानच्या 'सितारे जमीन पर'मधून झळकली. अशातच आता अभिनेत्रीने तिच्या आगामी दाक्षिणात्य चित्रपटाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी प्रसिद्ध दाक्षिणात्य दिग्दर्शक एसएस राजामौली यांनी तिचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं. जिनिलीया 'ज्युनिअर' या दाक्षिणात्य चित्रपटातून झळकणार आहे. हा चित्रपट १८ जुलैला प्रदर्शित होणार आहे. यामध्ये जिनिलीयासह दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला, अभिनेते राव रमेश, आर. रवीचंद्रन हे कलाकार झळकणार आहेत. राधाकृष्ण रेड्डी यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. जिनिलीया या चित्रपटातून तेलुगू चित्रपटसृष्टीत पुनरागमन करत आहे.ज्युनिअर' चित्रपटाच्या एका कार्यक्रमाला दिग्दर्शक, निर्माते राजामौलींनीही हजेरी लावली होती. त्यावेळी त्यांनी जिनिलीयाच्या तेलुगू इंडस्ट्रीतील पुनरागमनाबद्दल त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. 'पिंकव्हिला साऊथ'च्या वृत्तानुसार, राजामौली जिनिलीयाला म्हणाले, "किती वर्षे झाले पण तू अजूनही तशीच दिसत आहेस. मी सिनेमॅटोग्राफर सेंथिलला विचारलं होतं की, आपल्याला नवीन जिनिलिया दिसेल का तर तोसुद्धा म्हणाला हो नक्कीच. त्यामुळे मी आतुरतेने तुझी वाट बघत आहे".जिनिलीया यावर म्हणाली, "तुम्ही खूप चांगले आहात सर माझ्यासाठी तुमचे हे शब्द फार महत्त्वाचे आहेत". जिनिलीया शेवटचं 'ना इश्तम' या तेलुगू चित्रपटातून झळकली होती. त्यानंतर आता ती 'ज्युनिअर' चित्रपटातून तेलुगू इंडस्ट्रीत पुनरागमन करत आहे. जिनिलीयाने आजवर 'बॉईज', 'सचिन', 'हॅपी', 'बोम्मारिल्लू', 'संतोष सुब्रमण्यम', 'उरुमी' यांसारख्या अनेक दाक्षिणात्य चित्रपटांतून काम केलं आहे.

## मूल झाल्यानंतर काम न मिळण्याची भीती होती

अनेकदा अभिनेत्रींना मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती असते. परंतु, अशा काही अभिनेत्री आहेत, ज्यांनी प्रेग्नन्सीनंतरही इंडस्ट्रीत कमबॅक केलं आहे. असंच एका मराठमोळ्या अभिनेत्रीलाही मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती होती; पण ती आजही मालिका, रंगभूमी या माध्यमांतून प्रेक्षकांचं मनोरंजन करीत आहे. याबाबत तिने एका मुलाखतीमधून सांगितलं होतं. मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती होती, असं वक्तव्य लोकप्रिय अभिनेत्री अदिती सारंगधर हिनं केलेलं. अदिती सारंगधर हिनं 'राजश्री मराठी'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबत सांगितलं होतं. त्यामध्ये तिला "तुला मूल झाल्यानंतर काम न मिळण्याची भीती होती का," असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर अदितीनं, "हो, मला मूल झाल्यानंतर काम मिळणार नाही याची भीती होती", असं उत्तर दिलेलं.अदिती म्हणालेली, "गरोदर असताना मला 'लक्ष्य' ही मालिका सोडावी लागली होती. त्याबरोबर 'प्रपोजल' हे नाटकसुद्धा बंद करावं लागलं. गरोदर असल्यामुळे हातातलं इतकं चांगलं काम थांबवावं लागलं. करिअरच्या शिखरावर असताना ब्रेक घ्यावा.



## तेजश्री प्रधानची झाली एक्झिट

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'प्रेमाची गोष्ट'मध्ये मोठा बदल झाला आहे. 'प्रेमाची गोष्ट'मध्ये प्रमुख भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री तेजश्री प्रधानने अचानक मालिकेला रामराम केला आहे. त्यामुळे सध्या तेजश्री चाहत्यांसह 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या प्रेक्षकांमध्ये नाराजीचं वातावरण पसरलं आहे. 'तू मालिका सोडू नकोस', 'मालिका सोडण्यामागचं कारण काय?', अशा प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटल्या आहेत. आता नवी मुक्ता साकारणाऱ्या अभिनेत्रीने चित्रीकरणाला सुरुवात केली आहे.'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. लवकरच स्वरदा मुक्ताच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. स्वरदाने 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या चित्रीकरणाला नुकतीच सुरुवात केली आहे. तिने इन्स्टाग्रामवर स्क्रिप्टचा फोटो शेअर केला आहे. "नवीन वर्षाची नवी सुरुवात", असं तिने त्या फोटोवर लिहिलं होतं. स्वरदाची ही इन्स्टाग्राम

## ॲक्शन नाही अन खलनायकही नाही

नेटफ्लिक्सवर या आठवड्यात बरेच चित्रपट, सीरिज रिलीज झाल्या आहेत. सध्या एक बॉलीवूड चित्रपट नेटफ्लिक्सवर पहिल्या क्रमांकावर ट्रेंड करतोय. १५५ मिनिटांचा हा चित्रपट सिनेमागृहांमध्ये नाही, तर थेट ओटीटीवर रिलीज करण्यात आला होता. या चित्रपटात एकही ॲक्शन सीन नाही, इतकंच काय तर यात कोणी खलनायकही नाही. एक साधीशी लव्ह स्टोरी असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना फारच भावला आहे. ओटीटीवरील ट्रेंडिंग चित्रपटांची यादी दर आठवड्यात बदलत असते. या आठवड्यात रिलीज झालेल्या एका चित्रपटाने टॉप १० ट्रेंडिंग सिनेमांच्या यादीत पहिलं स्थान मिळवलं आहे. या चित्रपटाचं नाव आहे 'आप जैसा कोई'.'आप जैसा कोई' हा एक हिंदी रोमँटिक-ड्रामा चित्रपट आहे. हा चित्रपट ११ जानेवारी रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. यामध्ये आर. माधवन व फातिमा सना शेख या दोघांनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत. तसेच आएशा रजा मिश्रा, नमित दास व मनीष चौधरी यांनीही या सिनेमात काम केलं आहे.या चित्रपटाची कथा झारखंडमधील जमशेदपूरला राहणारा श्रीरेणू त्रिपाठी (आर. माधवन) व कोलकात्यात राहणाऱ्या मधु बोस (फातिमा सना शेख) यांच्याभोवती फिरते.



## अखेर अंकिताच्या घरी 'ती' आलीच!

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. गेल्या काही महिन्यांपासून ही 'कोकण हार्टेड गर्ल' तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. येत्या काही दिवसात अंकिता संगीत दिग्दर्शक कुणाल भगतशी लग्नगाठ बांधणार आहे. यापूर्वी 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. ती म्हणजे अंकिताच्या घरी नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे.अंकिताने सोशल मीडियावर 'ती येतेय', 'ती आलीये... वाट बघतेय' अशा पोस्ट शेअर तिच्या सगळ्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण केली होती. अंकिताने नेमकं काय सरप्राइज देणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर नव्या गाडीची पहिली झलक तिने फोटो शेअर करत सर्वांना दाखवली आहे. अंकिता वालावलकरने ऑडी ही आलिशान गाडी खरेदी केली आहे. गाडीचा पहिला फोटो शेअर करत याला 'कोकण हार्टेड गर्ल'ने 'आवडी आली' असं कॅप्शन दिलं आहे.गाडी खरेदी करताना अंकितासह तिचा होणारा नवरा कुणाल देखील उपस्थित होता. काही दिवसांपूर्वीच तिने आपली पहिली कार विकली होती. ही कार विकल्यावर अंकिताने, दुसरी गाडी घ्यायचा विचार होता म्हणून जुनी गाडी विकली. सध्या मी दोन-तीन गाड्यांमध्ये कन्फ्युज असल्याचं सांगितलं होतं. त्यामुळे अंकिता लवकरच नवीन गाडी खरेदी करेल याची हिंट सर्वांना आधीच मिळाली होती. अखेर नव्या गाडीचा फोटो शेअर करत 'कोकण हार्टेड गर्ल'ने ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत अनेक सेलिब्रिटींनी नवीन गाड्या खरेदी केल्याचं पाहायला मिळालं आहे. यात आता अंकिताचं नाव देखील जोडलं गेलं आहे. अंकिताच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर तिला प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर म्हणून ओळखलं जातं. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे ती घराघरांत लोकप्रिय झाली. या सीझनच्या महाअंतिम फेरीपर्यंत ती पोहोचली होती.आता वैयक्तिक आयुष्यात लवकरच कोकण हार्टेड गर्ल विवाहबंधनात अडकणार आहे. सध्या नव्या गाडीसाठी सगळ्या चाहत्यांनी अंकितावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. गेल्या काही महिन्यांपासून ही 'कोकण हार्टेड गर्ल' तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. येत्या काही दिवसात अंकिता संगीत दिग्दर्शक कुणाल भगतशी लग्नगाठ बांधणार आहे. यापूर्वी 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. ती म्हणजे अंकिताच्या घरी नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे.

**१५ चेंडूत झळकावले अर्धशतक** 51वर्षांनंतर केला 'हा' कारनामा; ठरला पहिलाच फलंदाज

# सरफराज खानने घडवला इतिहास!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विजय हजारे ट्रॉफी २०२५-२०२६ च्या सातव्या फेरीत गुरुवारी सरफराज खानने इतिहास रचला आहे. पंजाबसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध खेळताना सर्फराजने फक्त १५ चेंडूचा सामना करत अर्धशतक झळकावले आहे, लिस्ट ए क्रिकेट इतिहासात त्याच्या आधी कोणत्याही भारतीय फलंदाजाला हा पराक्रम करता आलेला नाही.भारताने १३ जुलै १९७४ रोजी हेडिंग्ले येथे इंग्लंडविरुद्ध पहिला लिस्ट ए सामना खेळला. हा पहिलाच एकदिवसीय सामना होता. ५१ वर्षांत कोणत्याही भारतीय फलंदाजाने हा पराक्रम करता आलेला नाही.**

## मुंबई इंडियन्सबरोबर करार




जयपूरमधील जयपुरिया विद्यालय मैदानावर २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करत असताना, मुंबईने शानदार सुरुवात केली. मुशीर खान आणि अंगकृष रघुवंशी यांनी ८.२ षटकांमध्ये पहिल्या विकेटसाठी ५७ धावांची भागीदारी रचली. त्याचा भाऊ मुशीर माघारी परतल्यावर, एका षटकात तीन षटकार आणि तीन चौकार लगावले. त्यानंतर त्याने डावखुरा फिरकीपटू हरप्रीत ब्रारला फटकावून पाच चेंडूत १९ धावा चोपल्या. सरफराज खान अखेर २० चेंडूत ६२ धावांवर मयंक मार्कंडेने त्याला एलबीडब्ल्यू केले. त्याने आपल्या खेळीत ७ चौकार आणि ५ षटकार लगावले. उपलब्ध माहितीनुसार, लिस्ट ए क्रिकेटमधील हे चौथे सर्वात जलद अर्धशतक ठरले आहे. या फॉरमॅटमध्ये सर्वात जलद अर्धशतक श्रीलंकेच्या कौशल्या वीरवत्नेने झळकवले होते. त्याने २००५-०६ च्या हंगामात एका घरगुती सामन्यात फक्त १२ चेंडूत अर्धशतक लगावले होते. सरफराजने महाराष्ट्राच्या अभिजित काळे आणि बडोद्याचा अष्टपैलू खेळाडू अतित शेठ यांचे विक्रम मोडीत काढले आहे.

काळेने १९९५ मध्ये बडोद्याविरुद्ध १६ चेंडूत अर्धशतक झळकावले होते, तर शेठने २०२१ मध्ये छत्तीसगडविरुद्ध १६ चेंडूत अर्धशतक ठोकण्याचा विक्रम केला केला होता. तथापि, सरफराजच्या या ऐतिहासिक खेळीनंतरही मुंबईने सामना गमावला.सरफराज खान सध्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज असून त्याने सहा डावांमध्ये ७५.७५ च्या सरासरीने आणि १९०.५६ च्या स्ट्राईक रेटने ३०३ धावा फटकावल्या आहेत. त्याने ३१ डिसेंबर रोजी गोवाविरुद्ध १५७ धावा केल्या आणि त्यापूर्वी उत्तराखंडविरुद्धही अर्धशतक लगावले होते. मुंबईने या स्पर्धेच्या बाद फेरीसाठी आधीच पात्रता निश्चित केली आहे.मुंबईच्या सामन्याबद्दल बोलायच झालं तर, १८ व्या षटकात १६९/३ वर मजबूत स्थितीत असून देखील, सूर्यकुमार यादव बाद झाल्यानंतर शिवम दुबे आणि कर्णधार श्रेयस अय्यर बाद माघारी गेले. यामुळे संघ अचानक कोसळला. चार विकेट्स शिल्लक असताना विजयासाठी १६ धावांची गरज असताना, मुंबईला हा सामना एका धावेने गमवावा लागला. विजय हजारे ट्रॉफी २०२५-२०२६ च्या सातव्या फेरीत गुरुवारी सरफराज खानने इतिहास रचला आहे.पंजाबसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध खेळताना सर्फराजने फक्त १५ चेंडूचा सामना करत अर्धशतक झळकावले आहे, लिस्ट ए क्रिकेट इतिहासात त्याच्या आधी कोणत्याही भारतीय फलंदाजाला हा पराक्रम करता आलेला नाही. भारताने १३ जुलै १९७४ रोजी हेडिंग्ले येथे इंग्लंडविरुद्ध पहिला लिस्ट ए सामना खेळला. हा पहिलाच एकदिवसीय सामना होता. ५१ वर्षांत कोणत्याही भारतीय फलंदाजाने हा पराक्रम करता आलेला नाही. जयपूरमधील जयपुरिया विद्यालय मैदानावर २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करत असताना, मुंबईने शानदार सुरुवात केली. मुशीर खान आणि अंगकृष रघुवंशी यांनी ८.२ षटकांमध्ये पहिल्या विकेटसाठी ५७ धावांची भागीदारी रचली. त्याचा भाऊ मुशीर माघारी परतल्यावर, एका षटकात तीन षटकार आणि तीन चौकार लगावले. त्यानंतर त्याने डावखुरा फिरकीपटू हरप्रीत ब्रारला फटकावून पाच चेंडूत १९ धावा चोपल्या.

### मुंबईच्या पदरात पराभव

आपल्या खेळीत ७ चौकार आणि ५ षटकार लगावले. उपलब्ध माहितीनुसार, लिस्ट ए क्रिकेटमधील हे चौथे सर्वात जलद अर्धशतक ठरले आहे. या फॉरमॅटमध्ये सर्वात जलद अर्धशतक श्रीलंकेच्या कौशल्या वीरवत्नेने झळकवले होते. त्याने २००५-०६ च्या हंगामात एका घरगुती सामन्यात फक्त १२ चेंडूत अर्धशतक लगावले होते. सरफराजने महाराष्ट्राच्या अभिजित काळे आणि बडोद्याचा अष्टपैलू खेळाडू अतित शेठ यांचे विक्रम मोडीत काढले आहे. काळेने १९९५ मध्ये बडोद्याविरुद्ध १६ चेंडूत अर्धशतक झळकावले होते.

# भारत-न्यूझीलंड सामन्यांची वेळ बदलली?

## भारत-न्यूझीलंड सर्व सामने दुपारी 1:30 वाजता सुरू होतील

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघ लवकरच २०२६ चा पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे. भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका ११ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. तर मालिकेतील पहिला सामना वडोदरा येथे खेळवण्यात येणार आहे.**







एकदिवसीय मालिकेचे संपूर्ण वेळापत्रक, ठिकाणे आणि सुरुवातीच्या वेळेसह स्पष्ट करूया. कृपया ही माहिती लक्षात ठेवा, अन्यथा तुम्ही सामन्याच्या दिवशी ते चुकवू शकता.भारत विरुद्ध न्यूझीलंड मालिकेची सुरुवात ११ जानेवारी रोजी होईल. पहिला सामना वडोदरामध्ये खेळला जाणार आहे. टीम इंडिया लवकरच तेथे पोहोचेल आणि त्यांची तयारी सुरू करेल. मालिकेचा दुसरा सामना १४ जानेवारी रोजी राजकोटमध्ये खेळला जाईल. मालिकेचा तिसरा आणि शेवटचा सामना १८ जानेवारी रोजी इंदूरच्या होळकर स्टेडियमवर खेळला जाईल, ज्यामुळे मालिकेचा शेवट होईल. या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली व्यतिरिक्त शुभमन गिल कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष असेल. गिलची बॅट सध्या शांत आहे आणि तो धावा काढत नाहीये.दरम्यान, सामन्यांच्या वेळेचा विचार केला तर, मालिका भारतात होणार आहे, त्यामुळे सामने दुपारनंतर सुरू होतील आणि संध्याकाळी उशिरापर्यंत चालतील. सर्व सामने दुपारी १:३० वाजता सुरू होतील, टॉस अर्धा तास आधी, दुपारी १ वाजता होईल. सामने देखील रात्री ९ वाजता संपतील. चांगली बातमी अशी आहे की सर्व सामने एकाच वेळी खेळले जातील, त्यामुळे दररोज वेळापत्रक बदलण्याची शक्यता नाही.

### बीसीसीआयकडून संघाची घोषणा

अलीकडेच, बीसीसीआयने मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. शुभमन गिल पुन्हा एकदा कर्णधार असेल आणि विराट कोहलीसह रोहित शर्माचीही मालिकेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच श्रेयस अय्यरला या मालिकेसाठी उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले असले तरी तो पूर्णपणे तंदुरुस्त असेल तरच तो खेळू शकेल.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

दि. 9 जानेवारी 2026

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## लोकसेवेचा वारसा आजही अखंड

# रावेत, किवळेच्या विकासाचे शिल्पकार : बबनराव भोंडवे ते तानाजी भोंडवे!

## प्रभाग 16 मधून आशा भोंडवे निवडणुकीच्या रिंगणात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज


**पुणे-पिंपरी चिंचवडमधील वेगाने विकसित होणाऱ्या रावेत आणि किवळे उपनगरांच्या जडणघडणीत भोंडवे कुटुंबाचे योगदान निर्णायक ठरले आहे. आज या परिसरात दिसणारा शहरी विकास, आधुनिक गृहसंकुले आणि नागरी सुविधा यामागे केवळ बदलती काळाची गरज नाही, तर दिवंगत बबनराव बाळाजी भोंडवे ते तानाजी बबनराव भोंडवे या पिढ्यान्‌पिढ्यांच्या लोकसेवेचा अखंड वारसा आहे.**











विशेष म्हणजे, आता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भोंडवे परिवारातील आशा तानाजी भोंडवे या प्रभाग क्रमांक 16 किवळे-मामुर्डी-विकासनगर-रावेत- गुरूद्वारा परिसरातून ~~निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या~~ आहेत. ही निवडणूक केवळ पदासाठी नव्हे, तर लोकसेवेचा वारसा आजही अखंड सुरू ठेवण्यासाठी लढत आहोत, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

**१८०० एकर जमिनीचा लढा आणि विकासाची पायाभरणी...**

रावेतच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचा प्रश्न. एकेकाळी रावेत व किवळे परिसरातील सुमारे १८०० एकर जमीन कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या ताब्यात जाण्याचा धोका निर्माण झाला होता. ही जमीन गेली असती, तर आजचा रावेत-किवळेचा विकासच प्रश्नचिन्हात आला असता. या निर्णायक क्षणी बबनराव भोंडवे यांनी नेतृत्वाची धुरा सांभाळली. राज्याचे नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दिल्लीपर्यंत पाठपुरावा करत शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या चिकाटीमुळे ही जमीन वाचली आणि रावेत-किवळेच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला. आज उभ्या असलेल्या गृहसंकुलांचा आणि वाढत्या नागरी वसाहतींचा पाया याच संघर्षातून घातला गेला.

**सहकारातून समाजकारण...**

संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन म्हणून बबनराव भोंडवे यांनी सहकार चळवळीला बळ दिले. त्यांच्या कार्यकाळात केवळ कारखान्याचा विस्तार झाला नाही, तर शेकडो स्थानिकांना रोजगार मिळाला. चेअरमन असतानाच त्यांचे निधन झाले, मात्र त्यांनी रुजवलेली समाजसेवेची बीजे आजही फुलताना दिसतात.

वडिलांच्या पश्चात तानाजी भोंडवे यांनी हा लोकसेवेचा वारसा समर्थपणे पुढे नेला. संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून त्यांनी जबाबदारीने काम केले. पदापेक्षा माणूस महत्त्वाचा, ही त्यांची भूमिका कायम राहिली आहे.

**रावेत-किवळेच्या विकासासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा...**

रस्ते, पाणीपुरवठा, वीज, ड्रेनेज यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी महापालिका आणि संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे, नागरिकांचे प्रश्न थेट मांडणे—या बाबींमध्ये तानाजी भोंडवे नेहमीच आघाडीवर राहिले आहेत. स्थानिक तरुणांना साखर कारखाना आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी मिळाव्यात, यासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

रावेत आणि किवळे परिसरातील नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच तानाजी भोंडवे यांची खरी ओळख आहे. लग्नकार्य असो, आजारपण असो किंवा दुःखद प्रसंग—“एका फोनवर हजर होणारा नेता” म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

### विकासाच्या इतिहासात ठसा अढळ...

एकेकाळी रावेत-किवळेच्या विकासाची दिशा ठरवताना भोंडवे कुटुंबाचा शब्द निर्णायक मानला जात असे. आजही त्यांच्या कार्याची छाप समाजकारणात आणि राजकारणात दिसून येते. बबनराव भोंडवे ते तानाजी भोंडवे असा लोकसेवेचा प्रवास हा रावेत-किवळेच्या विकासाच्या इतिहासात अखंड आणि प्रेरणादायी ठरला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या बाईक रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रभाग क्रमांक 21: घोषणांनी दणाणलेला परिसर देतोय ‘‘घडयाळयाच्या विजयाची’’ खात्री

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २१ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या भव्य बाईक रॅलीस नागरिकांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.**




राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार निकिता अर्जुन कदम, संदीप बाळकृष्ण वाघेरे, प्रियंका सुनील कुदळे आणि हिरानंद उर्फ डब्बू आसवाणी यांच्या प्रचारार्थ ही बाईक रॅली काढण्यात आली होती. प्रभागातील विविध भागांतून ही रॅली मार्गक्रमण करत असताना युवकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

हातात पक्षाचे झेंडे, घोषणांनी दणाणलेला परिसर आणि उमेदवारांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे संपूर्ण प्रभागात निवडणुकीचे वातावरण तापले होते. विकास, स्थानिक प्रश्न आणि नागरिकांच्या हितासाठी काम करण्याचा निर्धार उमेदवारांनी यावेळी व्यक्त केला.

या बाईक रॅलीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद आणि उमेदवारांबद्दलची जनतेची सकारात्मक भावना स्पष्टपणे दिसून आली. नागरिकांनी रॅलीदरम्यान उमेदवारांचे ठिकठिकाणी स्वागत करून आपला पाठिंबा दर्शविला. या अभूतपूर्व प्रतिसादामुळे आगामी निवडणुकीत प्रभाग क्रमांक २१ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस यश मिळेल, असा विश्वास कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### मिशन- PCMC : उमेदवारांनी साधला मतदारांशी थेट संवाद

# दिघी–बोपखेल परिसरात भाजपच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार!

## पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी–चिंचवड: पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने दिघी–बोपखेल–गणेशनगर परिसरात प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. श्रुती विकास डोळस, कृष्णा भिकाजी सुरकुले, हिरा नानी गोवर्धन घुले आणि उदय दत्तात्रय गायकवाड या उमेदवारांनी मतदारांशी थेट संवाद साधत व्यापक प्रचार फेरी राबवली.**

प्रचाराच्या दरम्यान तनिष होम सोसायटी, सुमन शिल्प, काटे वस्ती तसेच चौधरी पार्क लेन क्रमांक १ ते ४ मध्ये कोपरा सभा आयोजित केल्या गेल्या. प्रत्येक ठिकाणी स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उमेदवारांनी परिसरातील विकासकामे, नागरी सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि युवकांसाठी संधी याबाबत आपले विचार मांडले. याशिवाय भारत माता नगर येथेही मतदारांच्या समस्या ऐकण्यासाठी सभा पार पडली.

**पुणे-पिंपरी चिंचवड**

**स्थानिक इतिहास**

कोपरा सभांमध्ये दत्तात्रय परांडे, पंडित वाळके, विकास डोळस, कुलदीप परांडे, नामदेव रढे, रमेश विरणक आणि प्रमोद परदेशी यांनी उमेदवारांना मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात नवजीवन स्पोर्ट फाउंडेशनच्या वतीने राघव मंगल कार्यालय येथे आयोजित सभेत क्रीडा, युवक सक्षमीकरण आणि सामाजिक उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला.

**भाजपाकडून वातावरण निर्मिती...**

विशेषतः ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधण्यासाठी विनायक पार्क, विजय नगर आणि रुणवाल पार्कमध्ये दत्तात्रय आबा गायकवाड यांच्यासह उमेदवारांनी चर्चा केली. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक सन्मान यासंदर्भात आश्वासने दिली गेली. एकूणच, दिघी–बोपखेल परिसरात झालेल्या विविध सभांमुळे भाजपच्या प्रचाराला चांगला प्रतिसाद मिळत असून निवडणुकीचे वातावरण पक्षाच्या बाजूने जोर धरताना दिसत आहे.

# दिघीत माजी सैनिकांचा भव्य मेळावा; भाजपाला जाहीर पाठिंबा

## मिशन–PCMC : भाजपाच्या पॅनेलची प्रचारात दमदार आघाडी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



> “‘राष्ट्र प्रथम’ या विचारधारेतून माजी सैनिक भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. त्यांनी दाखवलेला विश्वास हा आमच्यासाठी मोठी प्रेरणा आहे. त्यांच्या अपेक्षांना पात्र ठरेल असे नियोजनबद्ध विकासकाम करून दिघी–बोपखेलचा सर्वांगीण विकास घडवण्याचा आमचा ठाम संकल्प आहे,”
>
> **—उदय गायकवाड,**
> उमेदवार, भाजपा, प्रभाग- 4,
> दिघी- बोपखेल.

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ (दिघी–बोपखेल) येथील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ माजी सैनिकांचा भव्य मेळावा परांडे नगर येथील ऑक्सिजन बँक्वेट हॉलमध्ये उत्साहात पार पडला. या मेळाव्यात माजी सैनिक संघाने भारतीय जनता पक्षाला जाहीर पाठिंबा दिला.**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माजी सैनिकांशी संवाद साधत त्यांच्या विविध मागण्यांवर भाजपा सरकार सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासन दिले. राष्ट्रसेवेसाठी माजी सैनिकांनी दिलेले योगदान अतुलनीय असून त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश दादा लांडगे यांनी महसूल मंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी दत्तात्रय आबा गायकवाड, संजय भाऊ गायकवाड,



निर्मलाताई गायकवाड, कुलदीप भाऊ परांडे, विकास डोळस, चेतन घुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ४ मधून भाजपाकडून श्रुती विकास डोळस, कृष्णा भिकाजी सुरकुले, हिरा नानी गोवर्धन घुले आणि उदय दत्तात्रय गायकवाड यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या मेळाव्यास ६०० हून अधिक माजी सैनिक उपस्थित होते.विकासाच्या मुद्द्यांवर आणि राष्ट्रहिताच्या भावनेतून माजी सैनिक भाजपाच्या विचारांसोबत असल्याने दिघी–बोपखेलमधील भाजपाचे चारही उमेदवार बहुमताने निवडून येतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. पिंपरी-चिंचवड महापालिकेवर पुन्हा एकदा ‘कमळ’ फुलेल आणि भाजपाचाच महापौर होईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for F.Y.B.Pharm

| Activity | Date |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046